Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट ता.१७/०६/२०२०

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीस अटक गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ९३/२०१९ भादवि कलम ३०२ आर्म ॲक्ट ४ (२५) प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपीत नामे कमलेश हिरामण कदम वय २३ वर्षे रा. गोडुंब्रे ता.मावळ जिल्हा पुणे हा दिनांक १६/०६/२०२० रोजी २२.३० वा. चे सुमारास चिंतामणी चौक वाल्हेकरवाडी चिंचवड येथे येणार असल्याची गुन्हे शाखा युनिट २ कडील पोलीस कॉंस्टेबल आतिष कुडके यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी बातमी मिळालेने पोलीस हवालदार केराप्पा माने, वसंत खोमणे, प्रमोद वेताळ अशांनी पोलीस निरीक्षक श्री शैलेश गायकवाड व पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार यांचे मार्गदर्शनाखाली सदर परिसरात सापळा लावुन आरोपी कमलेश हिरामण कदमयास पोलीस आल्याची चाहूल लागताच पळुन जात असतांना पाठलाग करुन पकडले. सदर आरोपीत हा गुन्हा दाखल झाल्यापासुन गेले दीड वर्षापासुन नमुद गुन्हयात पाहीजे आरोपी होता तसेच पोलीस रेकॉर्डवर टॉप २५ आरोपींचे रेकॉर्डवर असल्याने मा. पोलीस आयुक्त सो यांनी सर्व गुन्हे शाखेंना आरोपीचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. पोलीस कॉंस्टेबल आतिष कुडके यांनी सदर आरोपीचा सातत्याने शोध घेवून सर्व प्रकारे माहीती काढूनगुन्हे शाखेकडील पथकाने ताब्यात घेतले आहे. आरोपी कमलेश हिरामण कदम वय २३ वर्षे रा. गोडुंब्रे ता.मावळ जि.पुणे यास तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाणेकडे गुन्हयाचे कामी हजर केले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री संदीप बिष्णोई, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे १ श्री आर आर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार ,पोलीस कर्मचारी निकम,चौधरी,वेताळ, खरात, स्वामी, माने ,खोमणे, दळे, मुंढे, तांबाळी, राऊत, सानप, कापसे, कुडके यांचे पथकाने केली आहे

शैलेश गायकवाड<br>
पोलीस निरीक्षक<br>
(गुन्हे शाखा **युनिट** -२)


RUN